रासनिप्रा

# राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
# महाराष्ट्र राज्य, पुणे

**जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, ५ बी. जे. रोड, पुणे –४११००१.**
**फोन नं.** - (०२०) २६०५०६४१
**मेल आयडी** - sceapune@gmail.com **वेब साईट** - scea.maharashtra.gov.in


निवडणूक प्राधान्य

जा.क्र.रासनिप्रा/ कक्ष- ११/ बाजार समिती/निवडणूक निरीक्षक /कार्ये/ २३८९/सन २०२३
दिनांक : २८/०३/२०२३

**वाचले** :- १. महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम १४ अ (१) (अ) मधील तरतुद

२. महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (दुसरी सुधारणा) अधिनियम २०२०, दिनांक १४.३.२०२०

३.महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समिती (समितीची निवडणूक) (पहिली सुधारणा) नियम २०२०, दिनांक १६.४.२०२१

४.या प्राधिकरणाकडील पत्र जा.क्र. २१५६/सन २०२३, दिनांक २१.०३.२०२३

५.या प्राधिकरणाकडील पत्र जा.क्र. २६०४/सन २०२१, दिनांक ०२.०९.२०२१

६.महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समिती (समितीची निवडणूक) (दुसरी सुधारणा) नियम २०२३, दिनांक १५.०३.२०२३

**प्रस्तावना** :-

ज्या अर्थी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम १४ अ (१) (अ) मधील तरतुदीनुसार राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूकांचे अधिक्षण, निर्देशन व नियंत्रण करण्याची जबाबदारी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणावर सोपवलेली आहे. आणि,

ज्या अर्थी, प्राधिकरणाने वाचले क्रमांक ४ च्या आदेशानुसार राज्यातील निवडणूकीस पात्र कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूकांकरीता निवडणूक कार्यक्रम दिनांक २७.०३.२०२३ पासून सुरु करणे संदर्भात आदेश निर्गमित केलेले आहेत. आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम १३ (१) (अ) (दोन) मधील तरतुदीनुसार ग्रामपंचायतींच्या सदस्यांकडून ४ सदस्य निवडले जाणार असून त्यापैकी १ सदस्य आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील व्यक्ती असणार आहे. आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समिती (समितीची निवडणूक) नियम २०१७ चे नियम २१ मधील तरतुदीनुसार आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील उमेदवाराने लगतपूर्वीच्या वर्षाचे त्याचे उत्पन्न व भू धारणा याचा तपशिल नामनिर्देशन पत्रामध्ये नमूद करणे अनिवार्य आहे. आणि,

ज्या अर्थी, एखाद्या व्यक्तीचे उत्पन्न व भू धारणा याबाबतचा दाखला देण्याचे अधिकार संबंधित तालुक्याचे तहसिलदार यांना प्राप्त आहेत. आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समिती (समितीची निवडणूक) नियम २०१७ चे नियम ९(१) मधील परंतुकानुसार कृषि उत्पन्न बाजार समितीच्या निवडणूकीकरीता संबंधित उमेदवाराने किमान १० आर जमीन धारण करणे अनिवार्य आहे. आणि,

ज्या अर्थी, आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील व्यक्तीच्या उत्पन्न आणि जमीन धारणा यांच्या मर्यादेबाबत महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ व महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समिती (समितीची निवडणूक) नियम २०१७ मध्ये स्पष्टता नसल्याने सदर प्रकरणी क्षेत्रीय स्तरावर संभ्रम निर्माण झालेला आहे. आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समिती (समितीची निवडणूक) नियम २०१७ चे नियम ३ (चार) मधील तरतुदीनुसार कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूका सुरळीतपणे व मुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी अधिनियम व नियमांच्या तरतुदींशी सुसंगत असतील असे विशेष किंवा सर्वसाधारण आदेश पारीत करण्याचे अधिकार प्राधिकरणास प्राप्त आहेत.

त्या अर्थी, प्राधिकरण कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूकीकरीता आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील व्यक्तीच्या उत्पन्नाची मर्यादा आणि किमान व कमाल जमीन धारणा संदर्भात खालील प्रमाणे आदेश देत आहे.

**-:: आदेश ::-**

महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम १४ अ (१) (अ) व महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समिती (समितीची निवडणूक) नियम २०१७ चे नियम ३ (चार) मधील तरतुदी अन्वये प्राप्त अधिकारानुसार प्राधिकरण कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूकीत आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील व्यक्तीच्या उत्पन्नाची मर्यादा आणि किमान व कमाल जमीन धारणासंदर्भात खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

१. **कुटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न मर्यादा** - रु. ८.०० लाखापेक्षा कमी.

२. **कुटुंबाची जमीन धारणा मर्यादा** - किमान १० आर व कमाल ५ एकर.

आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील व्यक्तीबाबत उपरोक्त दोन्ही बाबींचे निकष विचारात घेऊन संबंधित तहसिलदार यांनी दिलेला दाखला विचारात घ्यावा.

**मा. आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मान्यतेने.**

(डॉ.पी.एल.खंडगळे)
सचिव,
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**प्रत :-**

तहसिलदार (सर्व)

**प्रत माहितीस्तव व आवश्यक कार्यवाहीस्तव :-**

१. जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स.) (सर्व)
२. निवडणूक निर्णय अधिकारी (संबंधित)

**प्रत माहितीस्तव व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव :-**

मा.जिल्हाधिकारी (सर्व)

२/- यांना कळविण्यात येते की, त्यांनी सदरची बाब तातडीने आपल्या अधिनस्त तहसिलदारांना निदर्शनास आणून देऊन सदर आदेशाचे काटेकोर पालन होईल याची दक्षता घेण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीस्तव सादर :-**

१. मा.अपर मुख्य सचिव (पणन), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. मा.विभागिय आयुक्त (सर्व)
३. मा.पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे